वर्धा वनविभागा अंतर्गत वनपरिक्षेत्र स्तरावर इमारतीचे बांधकाम व पाईपलाईन बांधकाम करणे एकूण घटक-६ (आष्टी, हिंगणी, खरांगणा परिक्षेत्र) व कोल्हापूर वनवृत्तातील गारगोटी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे बांधकामासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४/फ-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९ मार्च, २०१८

**वाचा :-** १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दिनांक ३० जून, २०१७
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र. कक्ष १/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२७/१७९५/२०१७-१८,दि. १९.१२.२०१७, क्र.१८५९, दि.०४.०१.२०१८ व क्र.२१९०, दि.२३.२.२०१८ चे पत्र.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांचे क्र.कक्ष-१२/योजना/प्र.क्र.५९/१६९/१७-१८, दिनांक १६.०३.२०१८ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्य योजना सन २०१७-१८ करिता प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६ ००२६) मध्ये (वनस्थानकाचे बांधकाम (२४०६-२१८८) व कायमस्वरुपी / तात्पुरत्या चेक नाक्याचे बळकटीकरण अतिरिक्त कार्यक्रमासाठी योजना (२४०६-२१४१) या दोन योजना समाविष्ट करण्यांत आलेल्या आहे.) सदर योजनेअंतर्गत वर्धा वनविभागातील वनपरिक्षेत्र स्तरावर इमारतीचे बांधकाम व पाईपलाईन बांधकाम करणे एकूण घटक-६ (आष्टी, हिंगणी, खरांगणा परिक्षेत्र) रु.५३.०८ लक्ष व कोल्हापूर वनवृत्तातील गारगोटी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे बांधकामासाठी रु.२४.९५ असा एकूण रु.७८.०३ लक्ष अनुदान वितरीत करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्ताव सादर करुन निधी वितरीत करण्यास विनंती केली आहे.

वार्षिक योजना सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत वनातील इमारती / प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६ ००२६) या योजनेकरीता रुपये २८५०.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये सदर नियतव्ययाच्या ८०% म्हणजेच रु.२२८०.०० मर्यादेत खर्च करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार मंजूर व अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या अनुषंगाने विविध शासन निर्णयान्वये रु.२२२५.५७ लक्ष इतक्या रक्कमेस शासन मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. आता वित्त विभागाच्या परिपत्रकान्वये ८० टक्केच्या मर्यादेत सदर योजनेंतर्गत रु.५४.४३ लक्ष नियतव्यय शिल्लक आहे. त्यानुसार वर्धा वनविभागातील वनपरिक्षेत्र स्तरावर इमारतीचे बांधकाम व पाईपलाईन बांधकाम करणे एकूण घटक-६ (आष्टी, हिंगणी, खरांगणा परिक्षेत्र)

यासाठी रु.२९.२८ लक्ष व कोल्हापूर वनवृत्तातील गारगोटी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे बांधकामासाठी रु.२४.९५ लक्ष असा एकूण रु.५४.४३ लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

वार्षिक योजना सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत वर्धा वनविभागा अंतर्गत वनपरिक्षेत्र स्तरावर इमारतीचे बांधकाम व पाईपलाईन बांधकाम करणे एकूण घटक-६ (आष्टी, हिंगणी, खरांगणा परिक्षेत्र) रु.२९.२८ लक्ष व कोल्हापूर वनवृत्तातील गारगोटी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे बांधकामासाठी रु.२४.९५ लक्ष असा एकूण रु.५४.४३ लक्ष इतका निधी (४४०६ ००२६) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४०१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु.तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
३. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.
४. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे यांची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
६. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.
७. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
८. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधान लेखाशिर्ष ४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च, राज्य योजना अंतर्गत योजना, (०१) वनीकरण, (०७०) दळणवळण व इमारती, (००) (०२)

वनातील इमारती बांधकाम (४४०६ ००२६) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१९१७४७२२६५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.19 17:49:55 +05'30'

**( सुजय दोडल )**
**सह सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर / कोल्हापूर
४. उपवनसंरक्षक, वर्धा वनविभाग, वर्धा
५. उपवनसंरक्षक, कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)